Registered with RNI
MAHABIL 06842/2013

BHAVMALA
Year-6, Issue-21, - April-May-June 2019

Printed Book/Periodicals
Book-Pocket

प्रति,
श्री./श्रीमती

If Undelivered return to :


**प्रेषक :-**
**प्रा.डॉ. प्रल्हाद वावरे**
संपादक, भावमाला
ग्रीन पार्क-१, श्रीरामपूर,
पुसद, जि. यवतमाळ (महा.) ४४५२१५

www.bhavmala.com
ISSN2395-0366

# भावमाला

वर्ष-६ वे, अंक-२१, एप्रिल-मे-जून २०१९

• संपादक - प्रा.डॉ. प्रल्हाद वावरे •



''४ थे 'शब्द' विश्व मराठी साहित्य संमेलन मलेशीया-२०१९''

## विशेषांक

वाटतो, भावमालेने मला एक स्वतंत्र ओळख निर्माण करून दिली, 'काही मिळविण्यासाठी, काही गमवावं लागतं' हे जरी खरं असलं तरी एक वाचक-लेखक चळवळ आजच्या डिजिटलायझेनच्या काळात मला अनुभवता आली हे मी माझं अहोभाग्य समजतो, या त्रैमासिकात सर्वांना संधी आहे, दुजाभाव नाही, मानवतेवर प्रेम करणारं कुणाचही, कोणतही, कोणत्याही प्रकारे मन दुखावणार नाही याची दक्षता मी गेल्या पाचवर्षात आवर्जून घेतली आहे आणि त्यातूनच उत्तम मार्ग सापडत गेले आज पाचवर्ष संपून सहाव्या वर्षात पदार्पण करतांना आपणा सर्वांचे मनस्वी आभार मानने हे मी माझे कर्तव्य समजतो. गेल्या तीन वर्षापासून ऑनलाईन पद्धतीने वेबसाईडच्या रूपात अंक उपलब्ध आहे. त्यावर सुद्धा अनेकांनी भेटी देवून माझा आनंद द्विगुणीत केला आहे. चळवळ ही एका व्यक्तीकडून कधीही पुढे जात नसते. माझे सर्व मित्र, हितचिंतक, वाचक, लेखक, कवी, समीक्षक, देणगीदाते, तथा उत्साह वाढविणारे, बळ देणारे सर्वच भावमाला परीवाराचे माझे सहकारी यांचा मी मनस्वी ऋणी आहे.

आजवर या त्रैमासिक भावमाला साहित्य चळवळीच्या रूपाने जे काही जीवनवादी विचार मांडले असतील ते समाजात किती रूजलेत किती नाही.... हे तर काळच ठरवेल मात्र, जीवनातील एका दुर्लक्षित अशा विषयांवर चिंतन मात्र घडून येतय याबद्दल मला समाधान आहे. एप्रिलमध्ये भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती तथा क्रांतीज्योती सावित्रीबाई व महात्मा ज्योतीबा फुले या पुण्यात्म्यांना विनम्र अभिवादन तथा सर्वच महामानवांना विनम्र अभिवादन, पुनच्च आपले सर्वांचे मनस्वी आभार, असाच स्नेह भविष्यातही असावा या अपेक्षेसह....

धन्यवाद !

– प्रा. डॉ. प्रल्हाद वावरे
संपादक, भावमाला

# त्रैमासिक 'भावमाला' परिवाराकडून संशोधन लेख मूल्यांकन समिती

## (रिसर्च पेपर रिव्हिव्ह कमिटी)

(खालील प्रमाणे सत्र २०१८-२०१९ साठी नियुक्त केली आहे.)

| | | |
|---|---|---|
| १. | प्रा. डॉ. श्रीकृष्ण काकडे, अकोला | ९८५०२५००७९ |
| २. | प्रा. डॉ. नवनाथ गोरे, औरंगाबाद | ९४२३२६१११४ |
| ३. | प्रा. डॉ. गणेश चव्हाण, नागपूर | ९८५०३२४२९८ |
| ४. | प्रा. डॉ. संजय पाटील, वाशीम | ९२७२७७१७०० |
| ५. | प्रा. डॉ. उदय जाधव, खटाव, सातारा | ९४२३८०७५०५ |
| ६. | प्रा. डॉ. श्याम जाधव, जरूड, अमरावती | ९१५८७०१९८७ |
| ७. | प्रा. डॉ. अनिल बाभूळकर, अकोट, अकोला | ९९२१५८६८२८ |
| ८. | प्रा. डॉ. मंदाकिनी मेश्राम-रेवसे, अमरावती | ९६७३१६३१९२ |
| ९. | प्रा. डॉ. संतोष चव्हाण, अमरावती | ९८२२९४५९४३ |
| १०. | प्रा. डॉ. वर्षा चिखले, अमरावती | ८८०६०९६६९९ |
| ११. | प्रा. डॉ. सुवर्णा गाडगे, अमरावती | ९४२३१५२९१२ |
| १२. | प्रा. डॉ. रूपेश कऱ्हाडे, दिग्रस, यवतमाळ | ९४२२८२२९६९ |
| १३. | प्रा. डॉ. प्रफुल्ल गवई, चिखली, बुलढाणा | ८३२९२८५२७५ |
| १४. | प्रा. डॉ. शरद वाघोळे, मंगरूळ पीर, वाशीम | ९४२१७४५३३५ |
| १५. | प्रा. डॉ. सुनंदा रेवसे, नांदुरा रेल्वे | ९४२१७४६९७५ |
| १६. | प्रा. डॉ. प्रदीप राऊत, घाटंजी, यवतमाळ | ९४२२८६५३७१ |
| १७. | प्रा. डॉ.माधव जाधव, नांदेड | ९४२३४३९९९१ |

## अंतरंग


- **शोध निबंध-**
  - १) डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे शैक्षणिक योगदान - डॉ. सुनंदा रेवसे
  - २) भटक्या विमुक्तांच्या आत्मकथनातील अस्तित्ववादी जाणीवा - डॉ. गणेश टाले
  - ३) मलेशीयातील भावस्पर्शी समीक्षा - डॉ. ज. पा. खोडके
  - ४) महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर - मधुकर तराळे
  - ५) युगप्रवर्तक सावित्रीबाई फुले - डॉ. प्रल्हाद वावरे
  - ६) भावस्पर्शी समीक्षक : 'सर्वस्पर्शी', आस्वादक, सर्जनशील, तत्वनिष्ठ भाष्यकार - शीलवंत वाढवे
  - ७) श्रीमंत - प्रा. अनिल भोने
- **प्रतिक्रिया -**
  - १) एका सहृद्य वाचकाची प्रतिक्रिया - प्रा. तात्याराव सूर्यवंशी
  - २) मलेशीयातील 'शब्द' चे चवथे मराठी विश्व साहित्य संमेलन - देवेंद्र भुजबळ
  - ३) मलेशीया चवथे विश्व संमेलन अविस्मरणीय अनुभव - डॉ. प्रल्हाद वावरे
- **परीक्षणे -**
  - १) 'निरंतर संघर्षरत कटिबद्ध कविता': प्रज्ञा कविता - प्रशांत ढोले
  - २) वऱ्हाडीची पालखी वाहणाऱ्या वारकऱ्यांचा हुंकार म्हणजे 'स्पंदन वऱ्हाड मातीचे' - अरूण विघ्ने
  - ३) वऱ्हाडी मायबोलीचा चंदनी दरवळ देशोदेशी पसरविणारा प्रातिनिधीक कविता संग्रह 'स्पंदन वऱ्हाड मातीचे' - राजेंद्र घोटकर
- **कथा-**
  - १) चिकाटी - संकलक -प्रा. अभिषेक श्रीरामवार
  - २) राष्ट्रीय संपत्ती - संकलक-ओंकार मनिष व्यवहारे
- **कविता-**
  - १) माय - प्रशांत ढोले
  - २) आठोण - अरूण विघ्ने,
  - ३) इळा - गोपाल शिरपूरकर
  - ४) श्रीराममंदीर एक पाहणे - वि. गु. गोंडचर
  - ५) छत्रपती शिवरायाचा पोवाडा - डॉ. गजानन हेरोळे
  - ६) मलेशीयाची कविता - देविदास मेटांगे
  - ७) नारीशक्ती - राजेश चौरपगार
  - ८) दारू...महारोग - प्राचार्य जयश्री कोटगिरवार
  - ९) पावसा.....ये ना शेतात - सुनिल बावने
  - १०) संचित (गझल) - सौ. किरण पिंपळशेंडे



हा अंक प्रकाशक, मालक प्रा.डॉ. प्रल्हाद वावरे यांनी निलेश प्रिन्टर्स, आठवडी बाजार, पुसद येथे छापून ग्रीन पार्क क्र. १ येथे खाजगी वितरणासाठी प्रकाशीत केला. या त्रैमासिकातील लेखकांनी लिहिलेल्या मतांशी संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. सर्व वादविवाद पुसद न्यायालयाअंतर्गत ---ील.




# संपादकीय....

मित्रांनो, सहाव्या वर्षात पदार्पण करतानाचा पहिला तसेच २१ वा अंक आपले हाती देतांना अत्यानंद होतो आहे, त्रैमासिक भावमाला एप्रिल-२०१४ पासून यशस्वी वाटचाल करीत आहे. तसेच सहाव्या वर्षात पदार्पण करते आहे, आजवर वीस अंक सलगपणे काढलेले असून माझ्या सर्व साहित्यिक मित्रांच्या वतीने ही साहित्य चळवळ जोमाने पुढे जात आहे. याचा मला मनस्वी आनंद आहे. नुकतेच मलेशीया येथे 'शब्द' चे चवथे विश्व मराठी साहित्य संमेलन संपन्न झाले. दि. ११ जाने.,२०१९ रोजी उद्घाटकीय कार्यक्रमात मान्यवरांच्या हस्ते 'त्रैमासिक भावमाला' ला पाचवर्ष पूर्ण झाल्यामुळे जाने.-२०१९ च्याअंकाचे प्रकाशन झाले. सातासमुद्रापलीकडे भावमालेने झेप घेतली हे आपणा सर्वांचे यश आहे असे मी समजतो. कोणत्याही चळवळीला बळ देणारी माणसं हवीत तेव्हाच आपल्याला पुढं जाता येतं, माझ्याही वाट्याला खरोखर अशी चांगली माणसं आलीत, आपण हा एप्रिल-२०१९ चा अंक 'शब्द विश्व मराठी साहित्य संमेलन-२०१९' विशेषांक म्हणून काढतोय, या अंकामध्ये माझ्या अनेक चाहत्यांनी अत्यंत सुंदर अशा प्रतिक्रिया दिल्या आहेत. याचा मला मनस्वी आनंद होत आहे. भावमालामध्ये येणारं सर्व सामान्य साहित्यिकांचं लेखन हे खरतर जीवनचिंतन करणारं आहे, नसेलही दर्जा त्याला...पण...जीवनाचं चूकलेलं गणित मांडण्यासाठी साहित्य मात्र नेहमीच मार्गदर्शक ठरत असते हे इतिहासातील अनेक साहित्यकृतींवरून दिसून येतं आपण जीवनाकडे सकारात्मक दृष्टीने बघायला शिकलं पाहिजे. असा संदेश आपल्याला साहित्य देतं, मित्रांनो, गेल्या पाच वर्षात मी अनेक नवोदितकलाकृतींना परीक्षणाच्या पातळीवर भावमालेत स्थान दिलं, माझा असा अनुभव आहे की, ते आता खूप प्रभावी आणि सुंदर लेखन करीत आहेत आज मला साहित्यावर अतूट प्रेम करणारी माणसं महाराष्ट्रभर भेटली आहेत तसेच बाहेरही बघायला मिळताहेत याचा मला खूप आनंद

## आमच्या भावमाला परिवारातर्फे

## सर्व आचार्य (पीएच. डी.) प्राप्त मित्रांचे

## हार्दिक अभिनंदन....!

डॉ. अनिल भगत, दारापूर (अमरावती)

डॉ. रंजूताई उद्धवराव मनवर, पुसद

संत गाडगेबाबा अम. विद्यापीठाने आचार्य पदवी मार्गदर्शक म्हणून नियुक्ती दिलेल्या सर्व मित्रांचे भावमाला परिवाराच्या वतीने हार्दिक अभिनंदन.....

१) डॉ. पी. बी. मांडवकर, कळंब

२) डॉ. एस ई. नवलाखे, बुलढाणा

३) डॉ. जी. जे. ढोले, तेल्हारा, अकोला

४) डॉ. एम. व्ही. भटकर, वलगांव

५) डॉ. एस. एन. पाटील, वाशीम

६) जी. आर. खारकर, अमरावती

७) डॉ. ए. एस. धोबे, शेंदूरजना घाट

८) डॉ. जी. के. टाले, धामणगाव, अम.

९) डॉ. ए. आर इंगळे, बुलढाणा

१०) डॉ. एस. वाय. लोहकरे, अमरावती

११) डॉ. आर. डी. मिरगे, वरूड

१२) डॉ. बी. एस. पाटील, अकोला

१३) डॉ. आर. बी. जाधव, नांदगाव खंडे. अम.

१४) डॉ. व्ही. एम. कांबळे, पांढरकवडा

१५) डॉ. जी. एम. गायकी, बुलढाणा

१६) डॉ. एस, जे वाघोळे मंगरूळ पीर

१७) डॉ. एस. जी. काकडे, अकोला

१८) डॉ. एस. एन. नागरे अकोला

१९) डॉ. व्ही. एम. जाधव, वाशीम

२०) डॉ. एस. के. रेवसे, नांदूरा

२१) डॉ. जी. जी. हेरोळे, दर्यापूर

२२) डॉ. पी. व्ही. देशमुख, चांदूरबाजार

२३) डॉ. आर. एम. केदार, तेल्हारा

२४) डॉ. पी. जी. राठोड, अमरावती

२५) डॉ. सी. डी. पाखरे, वरूड

२६) डॉ. जी. डी. बनसोड, अमरावती

२७) डॉ. जी. आर. लोहवे, पारवा

२८) डॉ. ए. एस. काळपांडे, मुळावा उमरखेड

२९) डॉ. के. एस. जमधाडे, भातकुली

३०) डॉ. ए. जे. देशपांडे, वणी

३१) डॉ. एस. आर. गाडगे, अमरावती

३२) डॉ. एस. व्ही. चतुर, दारव्हा

३३) डॉ. पी. जे. वावरे, पुसद

३४) डॉ. डी. के. राऊत, अमरावती

३५) डॉ. पी. डी. देवके, मंगरूळ पीर, वाशीम



ISSN2395-0366

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे शैक्षणिक योगदान

– प्रा. डॉ. सुनंदा रेवसे, नांदूरा रेल्वे

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना जयंती निमित्त विनम्र अभिवादन.....

'डॉ. बाबासाहेब नसते तर....संघर्षाचे बीज कुणी पेरले असते? कुणी वेदनांवर फुंकर घातली असती? ध्येयाचा तारा कुणी दाखविला असता? कुणी आयुष्याला मोल दिले असते? मानवी स्वातंत्र्याचा अर्थ कुणी सांगीतला असता? विद्रोहाचा सूर कुणी दिला असता? कुणी जोडले असते मानवी संस्कृतीला इतिहासाचे नवे पान?

१४ नोव्हेंबर १९५६ ची सुंदर, प्रसन्न सकाळ दलितांच्या जीवनात कुणी निर्माण केली असती? बुद्ध, धम्म आणि संघाचा पावनघोष या भूमीत कुणी निनादित केल असता? खरचं मूकनायक युगायुगातून एकदाच जन्माला येतो आणि डॉ. बाबासाहे आंबेडकर हे नाव युग एकदाच धारण करतं.'

मानवसमाजापुढे महानतेचा वाटा अंथरून ठेवणारा मानव म्हणजे महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडेर होत. त्यांनी आयुष्यभर प्रामाणिकपणा हीच आपली निष्ठा मानली. बुद्धीवाद हेच तत्वज्ञान मानलं आणि समाजाच्या नाड्या ओळखून त्यांच्या पुढे उन्नतीचा मार्ग ठेवला. या युगपुरूषाने बहुजनांच्या न्याय्य हक्कांसाठी संस्कृती विरूद्ध महासंग्राम पुकारला समाजाने त्यांचा सामाजिक न्याय नाकारला पण त्यांनीच समाजाला माणूसकीचे मर्म समजून दिले. जणू त्यांनी म्हटले–

'शब्दांची पूजा मानत नाही मी<br>
माणसांसाठी आरती गातो,<br>
ज्यांच्या गावात उजेड नाही<br>
त्यांच्या साठी सूर्य मागतो...'

म. फुल्यांचा शैक्षणिक वारसा सर्वतोपरी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी चालवला. एक अविद्या केवढा मोठा अनर्थ घडवू शकते हे डॉ. बाबासाहेबांपेक्षा चांगले आणखी कोणाला माहित असेल? म्हणूनच ज्याला देशीय मूलाधार आहे. असे शैक्षणिक तत्वज्ञान त्यांनी प्रतिपादन केले. निरक्षर जनतेमध्ये शिक्षणाचा प्रसार करण्यासाठी शैक्षणिक संस्था स्थापन केल्या. डॉ. बाबासाहेबांनी सामाजिक परिवर्तनाची तरफ म्हणून आणि सामाजिक अभियांत्रिकीचे हत्यार म्हणून शिक्षणाचा पाठपुरावा केला. त्यांना शिक्षण हे आत्यांतिक ऐहिक हिताचे वाटत होते. शिक्षणा शिवाय जीवनामध्ये दुसरे कोणतेही हित प्राप्त करून

ISSN2395-0366

... शक्य नाही असे त्यांचे ठाम मत होते. म्हणूनच ते शिक्षणाला वाघिणीचे दूध म्हणतात. ते जो घेईल तो गुरगुरल्याविना राहणार नाही असा त्याचा विश्वास होता. समाजातील विषमता दूर करण्यासाठी त्यांना शिक्षण हा एक राजमार्ग वाटत होता. त्यांनी म्हटले होते की, शिक्षणाचा हेतू लोकांचे नैतिकीकरण आणि सामाजिकरण करणे हा होता. सभ्यता आणि संस्कृती याचा शिक्षण हा पाया होता. त्याचा आग्रह होता की, जातीप्रथेच्या तटबंधावर उघड उघड हल्ला करण्यासाठी अस्पृश्यांनी शिक्षण घेतले पाहिजे.

शिक्षणातील आपल्या लोकांच्या मागासलेपणाची जाणीव डॉ. बाबासाहेबांना नेहमी होती. त्यांची प्रगती घडवून आणण्यासाठी शिक्षणाशिवाय अन्य उपाय नाही हे त्यांनी पुरते ओळखले होते. म्हणून त्यांना शिक्षण दुधारी शस्त्राप्रमाणे वाटायचे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे शैक्षणिक योगदान हे जनसामान्यासाठी तसेच वंचितांसाठी होते. स्वातंत्र्य, समता आणि बंधूभाव या तीन मानव कल्यानाच्या तत्वास अनुसरून जीवन जगणारा समाज शिक्षणातून निर्माण व्हावा असे त्यांना अंत:करणापासून वाटत होते. त्यासाठीच ते जीवनभर सातत्यपूर्ण कार्यरत राहिले. म्हणूनच तर यशवंत मनोहर बाबासाहेबांना उद्देशून म्हणतात–

'आमची लक्तरलेली आयुष्ये शिवलीस
तो सुईदोरा कुठे ठेवलास?
गांजलेल्या जन्मांना नरकातून ओढून पोटाशी घेतलेस
ती माऊलीची माया तू कुणाजवळ ठेवलीस?'

आज बाबासाहेब असते तर त्यांच्या घरावर नावाची पाटी लावलेली असती आणि त्यात साऱ्या पदव्याच पदव्या असत्या. असा हा पदव्यांचा अलेक्झांडर होता. त्यांच्या अभ्यासिकेत सदैव ज्ञानाचं अग्निहोत्रच पेटलेलं असायचं. औरंगाबादचा मिलिंद परिसर आणि नागसेन वन, मुंबईचे सिद्धार्थ महाविद्यालय ह्या बाबासाहेबांच्या कर्तृत्वाच्या पताका आहेत. बाबासाहेब ग्रंथवेडे होते. त्यांना हे वेड वडिलोपार्जित प्राप्त झाले होते. त्यांच्या वडिलांनी त्यांना ग्रंथ पुरविण्यास कधीच कचूराई केली नव्हती. ग्रंथ हेच बाबासाहेबांचे अन्न होते, पक्वान्न होते. ग्रंथाविषयी आपली भावना व्यक्त करतांना ते म्हणतात 'सगळ्या जगाने मला दूर लोटले तेव्हा माझ्या ग्रंथांनी मला धिर दिला. माझे डोळे जर अधू झाले तर माझ्या जीवनातील स्वारस्यच संपेल. माझ्या दुर्दैवाने कधी घरावर जप्ती आली, दागदागीने, मौल्यवान वस्तु कधी लिलावात निघाल्या तरी मी ते सहन करीन पण...माझ्या ग्रंथांना कोणी हात लावला तर मी तो हात कलम करण्यासाठी मागेपुढे



पाहणार नाही.' असे हे ग्रंथेवेडे बाबासाहेब श्रेष्ठ ग्रंथकार होते. या श्रेष्ठ ग्रंथकाराने आपल्या करणी आणि लेखनीने तसेच वाणीच्या जोरावर जगात विश्वविद्वान बनण्याचा मान पटकावला.

डॉ. बाबासाहेब यांचे शैक्षणिक विचार व योगदान पुढीलप्रमाणे विशद करता येईल–

१) व्यक्तीला जाणीव करून देण्यासाठी शिक्षण
२) शिक्षण एक शस्त्रच
३) विषमता नष्ट करण्यास व सामाजिक लोकशाहीसाठी शिक्षण
४) शिका, संघटित व्हा व संघर्ष करा
५) समानतेसाठी शिक्षण
६) शिक्षण एक अन्न व शक्ती
७) शिस्त व विकासाठी शिक्षण
८) शिक्षण मूल्याधिष्ठीत
९) शिक्षण एक पवित्र कार्य
१०) समाज परिवर्तनाचे व क्रांतीचे पवित्र साधन शिक्षण
११) स्त्री शिक्षण
१२) विद्येला प्रज्ञा, शील, करूणा आणि मेत्री या परिमितीची गरज

**डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या मते शिक्षणापासून विद्यार्थांमध्ये–**

१) विचार करण्याची शक्ती वृद्धींगत झाली पाहिजे.
२) त्यांच्या ठीकाणी समस्या सोडविण्याची क्षमता आली पाहिजे.
३) त्याला स्वाभिमान जतन करता आला पाहिजे.
४) इतरांना सुधारण्यासाठी त्याने स्वत: आधी सुधारले पाहिजे
५) स्वावलंबी बनल्याशिवाय त्याला संघटनेचे कार्यक्षेत्र वाढविता येणार नाही त्यासाठी त्याने स्वत:चा उद्धारकर्ता बनावे इतरांवर अवलंबून राहता कामा नये.

मुंबई येथे दि. १७ डिसेंबर, १९३८ रोजी बाबासाहेबांनी विद्यार्थांना उपदेश केला की, 'शिकलेल्या माणसात काही दोष असतात. पहिली गोष्ट म्हणजे शिक्षण पुरे झाल्यावर मनुष्य स्वत:चे हित पाहतो, समाजाचे पाहत नाही. तो आपल्या बायका पोरांची व स्वत:च्या हिताचीच काळजी घेतो. दुसरी गोष्ट अशी की, शिकलेल्या माणसात कर्तव्यापेक्षा हक्काची जाणीव जास्त उत्पन्न होते. आपले कर्तव्य कोणते, याची भावना जागृत होत नाही.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे कलात्मक जीवन जगणारे रसिक होते तसेच भावसंपन्न जीवन जगणारे एक प्रापंचिकपण होते. त्यांना सुंदर फाउंटन पेन, नवे शब्दकोश, फिरावयास जातांना हाती घ्यावयाच्या काठया यांचा संग्रह करणे आवडत असे. दिल्लीतील आपल्या निवास्थानाला एका अंगाने राजप्रासादाचे आणि दुसऱ्या अंगाने अत्यंत साधे असे रूप दिले होते. बाबांची अभ्यासिका, स्वयंपाकघर आणि विश्रांतीची खोली अतिशय साधी होती. पण त्यांचा दिवानखाना आणि उरलेले घर सदैव सजलेले असे एकदा कोणीतरी त्यांना विचारले की, डॉक्टर साहेब 'एकाच वेळी ही साधी आणि उच्च अशी दुहेरी राहणी कशासाठी?' डॉक्टरसाहेब म्हणाले, 'साधेपणा माझ्यासाठी, दिमाख तो माझ्या दलितबांधवांना आत्मप्रत्ययाची स्फुर्ती देण्यासाठी !' कन्फूशियस या तत्ववेत्याचे एक वचन बाबासाहेब आपल्या अनुयायांना नेहमी सांगत असत की, 'तुमच्याजवळ दोन आणे असतील तर एका आण्याचे अन्न खरेदी करा, दुसऱ्या आण्याचे एक फुल विकत घ्या. अन्न तुम्हाला जगविल, फुल तुम्हाला जगावयास शिकविल'.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे शैक्षणिक कार्य-

डॉ. बाबासाहेब या क्रांतीसूर्याला उद्देशून कुणीतरी म्हटले आहे-

'हे सूर्या,
तू तिथला अन मी इथला
चल आपण दोघे मिळून
एक करार करू....
परिवर्तनाचा ठराव करू
अरे ! तू ताऱ्यांना प्रकाशमान कर
मी या साऱ्यांना प्रकाशमान करतो !'

यावरून बाबासाहेबांच्या कार्याचा आवाका लक्षात येतो. सुरेश भट त्यांच्या गौरवार्थ म्हणतात-बाबासाहेब तुमच्या धम्मचक्रप्रवर्तनानेच कालचे मुके आज बोलायला लागले. काय सत्य आणि काय असत्य यातील भेद ते जाणायला लागले. ज्ञानाची गंगा समाजाच्या खालच्या थरापर्यंत पोहोचल्यावाचून देशाचा उद्धार होणार नाही या भावनेनेच आपले सर्वस्व त्यांनी ज्ञानदानाच्या कार्यास वाहिलेले होते. त्यातूनच त्यांनी पुढील कार्ये केलीत-

१) बहिस्कृत हितकारीणी सभेची स्थापना
२) दलित वर्ग शिक्षण संस्थेची स्थापना



३) शिक्षण व्यवसायात प्रवेश
४) पिपल्स एज्युकेशन सोसायटीची स्थापना
५) राजकीय पक्षांची स्थापना

१. स्वतंत्र मजूर पक्ष २. शेड्यूल कास्ट फेडरेशन ३. रिपब्लीकन पक्ष बाबासाहेबांनी विद्येला शस्त्र म्हटले त्यामुळे त्याचा जपूनच वापर करणे गरजेचे असते. अस्पृश्य समाजाचे योग्य शिक्षण झाल्यास तो समाज आपल्या हक्कांसाठी जागृत राहिल व ते हक्क प्राप्त करण्यासाठी प्रयत्न करील. असा त्यांचा विश्वास होता. डॉ. बाबासाहगबांनी अस्पृश्यांच्या उद्धारासाठी व शैक्षणिक प्रगतीसाठी २० जुलै, १९२४ रोजी बहिस्कृत हितकारीणी सभेची स्थापना केली. या सभेची ध्येये व उद्दिष्टे पुढीलप्रमाणे होती.-

अ) वसतीगृहे उघडून दलित वर्गात शिक्षणाच्या प्रसाराचे संचालन करणे
ब) वाचनालये, समाजकेंद्रे आणि वर्ग किंवा अभ्यासमंडळे उघडून दलित वर्गामध्ये संस्कृतीच्या प्रसाराचे प्रचालन करणे.
क) औद्योगिक आणि कृषिशाळा सुरू करून दलित वर्गाच्या आर्थिक स्थितीमध्ये प्रगती आणि सुधारणा करणे.

इ. स. १९२५ मध्ये बहिस्कृत हितकारीणी सभेने दलित वर्गाच्या हायस्कूल विद्यार्थ्यांसाठी सोलापूर येथे वसतीगृह सुरू केले. विद्यार्थ्यांना लागणारे कपडे, लेखन सामग्री, भोजन याचा खर्च त्यांनी दिला. विद्यार्थ्यांच्या मनात ज्ञान आणि विद्या समाजसेवेची गोडी निर्माण व्हावी म्हणून बहिस्कृत हितकारीणी सभेच्या मार्गदर्शना खाली 'सरस्वती विलास' नावाचे मासिक काढले. शिवाय मुंबईमध्ये एक मोफत वाचनालय आणि 'महार हॉकी क्लब' सुरू केला. अशा आशेने की, जुगार, मद्यपान, इतर व्यसने आणि करमनुकीचे रोगट मार्ग यापासून अस्पृश्य मुले व समाज दूर रहावा. इ. स. १९२८ मध्ये आपल्या जमातीचे शालेय शिक्षण भक्कम पायावर संघटित करण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी 'दलिवर्ग शिक्षण संस्थेची' स्थापना केली. यावेळी पाच वस्तीगृहांच्या योजनेला शासनाने मान्यता दिली.

बाबासाहेब या संस्थेचे प्रमुख कार्यवाह होते. ८ जूलै, १९४५ रोजी मुंबई येथे निम्न मध्ये वर्गामध्ये आणि विशेषता अनुसूचित जातीमध्ये उच्च शिक्षणाचे प्रमाण वाढावे म्हणून पिपल्स एज्युकेशन सोसायटीची स्थापना केली. यासंदर्भात डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात की, या शिक्षण संस्थेचा हेतू केवळ शिक्षण देण्याचाच नव्हता तर शिक्षण अशा रीतीने दिले जाईल की, त्यामुळे भारतात बौद्धीक, सामाजिक आणि नैतिक लोकशाहीचा

प्रचार आणि प्रसार करता येईल. बहिस्कृत, मूकनायक, जनता, प्रबुद्ध भारत हा नियतकालिकांचा प्रवास दलित जनतेचा विकासाचा टप्पा निश्चित करतो.

पिपल्स एज्युकेशन सोसायटी अंतर्गत मुंबई येथे २० जून, १९४६ रोजी सिद्धार्थ कला आणि विज्ञान महाविद्यालय सुरू केले. आपल्या जीवनकाळात डॉ. बाबासाहेबांनी १९ जून, १९५० रोजी औरंगाबाद येथे मिलिंद कला आणि विज्ञान महाविद्यालय स्थापन केले. तसेच १९५३ मध्ये मुंबई येथे सिद्धार्थ वाणिज्य आणि अर्थशास्त्र महाविद्यालय आणि १९५६ मध्ये सिद्धार्थ विधी महाविद्यालय स्थापन केले. हे महाविद्यालय डॉ. बाबासाहेबांच्या महानिर्वाण वर्षी सुरू करण्यात आले होते. विशिष्ट ध्येयाने प्रेरित होवूनच या महाविद्यालयाची स्थापना करण्यात आली होती. त्यामुळे ही महाविद्यालये दलितोद्धाराची उगमस्थाने आणि प्रेरणास्थाने बनली होती.

तात्पर्य अशा प्रकारे एम. ए. (कोलंबिया), पीएच. डी. (कोलंबिया), डी. एस्सी. (लंडन), एल. एल. डी. (कोलंबिया), डी. लीट. (उस्मानिया), बार-अॅट-लॉ (लंडन) इ. पदव्या घेवून भारतात ललामभूत करणारे हे विश्वरत्न म्हणजेच बाबासाहेब आंबेडकर. यांनी समाजाला प्रज्ञा-शील-करूणा हा धम्ममार्ग दाखविला भगवान बुद्धाचा धम्म हा शील प्रज्ञा आणि करूणा या जीवनतत्वावर आधारित आहे. जेथे प्रज्ञा आहे. तेथे अंधश्रद्धेला अवसर नाही. माणूस प्रज्ञावंत असेल पण शीलवान नसेल तर प्रज्ञा ही पापाची जननी ठरू शकते. अन्य घटकांविषयी सहानुभूती किंवा आत्मीयता नसेल तर आदर्श समाजजीवन अशक्य आहे. तेथे 'बहुजन सुखाय-बहुजन हिताय' हे तत्व राबविले जाणार नाही. यासाठी मानवमुक्तीचा, स्त्रीमुक्तीचा, दास्यमुक्तीचा गुलामीतून मुक्त होण्याचा मार्ग डॉ. बाबासाहेबांनी आपल्या शिक्षण विषयक विचारातून व योगदानातून अमलात आणला आहे. म्हणूनच म्हणते की-

'हे मानसा,
इथे मी तुझे गीत गावे
असे गीत गावे की, तुझे हित व्हावे
एकाने रडावे आणि अनेकांनी हसावे
असे आता कधी न व्हावे....'

अशाप्रकारे दलितांचे उद्धारकर्ते भारतीय संविधानाचे शिल्पकार, धम्मचक्र प्रवर्तनाचे अग्रणी, लोकशाहीचे त्राते, मानवी हक्काचे प्रबळ प्रवक्ते, हिंदू कोड बिलाचे पुरस्कर्ते बोधीसत्व भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या शैक्षणिक योगदानातून



व राजकीय पुढाकारातून अस्पृश्यता निवारण, जातीय संस्थेच्या उच्चाटनाचे कार्य अतिशय निष्ठेने केले. दीनदुबळ्यांचे युगायुगाचे अपार दु:ख, अमानुष छळ, दुर्धर समस्या याचसाठी आयुष्यभर संघर्ष केला. एका दलित वृद्ध गृहस्थाच्या शब्दात म्हणायचे तर 'त्यांनी आम्हाला तारांगणात नेवून बसविले' पुढील ओळींमधून लक्षात येईल की, अस्पृश्यांच्या हृदयात बाबासाहेबांचे काय स्थान आहे -

'हे भगवान भीमा,
तू मुक्तीदाता स्पॉर्टेकस
तत्वज्ञानी सॉक्रेटिस, शब्दप्रभू डॅमोस्थेनिस
ऑरिस्टॉटल विधीज्ञ तू बुद्धीचा तू सॅमसन,
निर्मिले त्वा संविधान, केले नवयुगाचे निर्माण,
लिंकन-लेनिन-आंबेडकर.....'

* संदर्भ सूचि-

१) डॉ. आंबेडकरांचे नेतृत्व - डॉ. एलिनार झेलिएट, अनुवाद-वसंत मून
२) डॉ. बाबासाहेब आंबेडकर चरित्र-धनंजय कीर
३) दीपस्तंभ-शिवाजीराव भोसले
४) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या सामाजिक व राजकीय चळवळी-श्रीकृष्णा मेनसे
५) उत्थानगुंफा (काव्यसंग्रह)-यशवंत मनोहर
६) दलितांचे बाबा-आचार्य प्र. के. अत्रे
७) अलित साहित्याचा इतिहास-म. सू. पगारे

- प्रा. डॉ. सुनंदा रेवसे
नांदूरा (रेल्वे)
संवाद-९४२१७४६९७५

***